महाराष्ट्र शासन

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय,अलिबाग, जि. रायगड.

जिल्हा सामान्य रुग्णालय परिसर, बीच रोड,अलिबाग.जि.रायगड

Email- deangmcalibag@gmail.com Phone No. 02141-299214 www.gmchalibag.in/gmch

निविदा सूचना जा.क्र. शावैमअ/वर्ग-४/काल्पनीक बाहयस्रोत/ १७४९ /२०२२ दिनांक १८ जुलै, २०२२

: ई–निविदा सूचना :

## NOTICE INVITING E-TENDER ( NIT)

( प्रथमवेळ निविदा प्रसिध्दी )

संदर्भ – बाहयस्त्रोत समिती, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, अलिबाग-रायगड
दिनांक. १७.०६.२०२२ रोजीच्या बैठकीतील निर्णय

शासन पत्र क्रमांक संकीर्ण-१०२२/प्र.क्र.१५/वैसेवा-४, दि. २३ फेब्रुवारी. २०२२ अन्वये तसेच शासनाचे पत्र क्र. एलईसी-१४२१/प्र.क्र.७३/वैसेवा-४, दि. १३ एप्रिल, २०२२ अन्वये रु. १५,०००/- प्रमाणे मासिक मुळ वेतन दर्शविण्यात आलेले आहे. शासन मंजूरीनुसार अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, अलिबाग येथील विविध विभागांसाठी आवश्यकतेनुसार 11 महीने अथवा शासनामार्फत कर्मचारी नियुक्त करणे यापैकी जे अगोदर घडले त्या कालावधीसाठी ) कंत्राटी पध्दतीने मनुष्यबळ दैनंदिन स्वच्छता सेवा ( शिपाई, सफाईगार, कक्षसेवक व सुरक्षा रक्षक ) पुरवठा करणेबाबत ई–निविदा मागविण्यांत येत आहेत.

| शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, अलिबाग-रायगड येथील विविध विभागांसाठी मनुष्यबळ सेवाकाल व निव्वळ कंत्राटी तत्वावर, बाहयस्त्रोतांमार्फत काम करुन घेण्याबाबत ई - निवीदा मागविणे आहे. | | |
|---|---|---|
| 01 | निविदा विक्री दिनांक (ऑनलाईन) | दि. १९/०७/२०२२ ते १०/०८/२०२२ |
| 02 | निविदा स्विकारण्याचा दिनांक (ऑनलाईन) | दि. १९/०७/२०२२ ते १०/०८/२०२२ ( सायंकाळी ४.०० वाजेपर्यंत ) |
| 03 | निविदा पूर्व बैठक | दि. २५/०७/२०२२ ( दुपारी ३.०० वाजता किंवा वेळेनुसार ) |
| 04 | निविदा उघउण्याचा दिनांक (ऑनलाईन) | दि. ११/०८/२०२२ ( दुपारी १२.०० वाजता किंवा वेळेनुसार ) |
| 05 | निविदाच्या अटी व शर्ती | अटी व शर्ती निविदा फॉर्म सोबत दिलेल्याप्रमाणे राहतील |
| 06 | निविदा किंमत | रु. १०,०००/- ( ना परतावा ) |
| 07 | निविदा बयाना रक्कम | रु. २,००,०००/- |
| 08 | ई–निविदा डाउनलोड करण्यासाठीचा कालावधी | दि. १९/०७/२०२२ सकाळी ११.०० वाजेपासून<br>दि. १०/०८/२०२२ रोजी सायंकाळी ३.०० वाजेपर्यंत उपलब्ध राहील. |

- उपरोकत ई–निविदा सूचनेतील अधिक माहितीकरिता इच्छुक निविदाकारांनी *Website* :- https://mahatenders.gov.in संकेतस्तळावर संपर्क साधावा.
- उपरोक्त ई-निविदा वर्ग -४ ही संस्थेच्या संकेतस्थळ www.gmchalibag.in/gmch वर उपलब्ध राहील.
- उपरोकत ई–.निविदेत सहभागी होणा–या निविदाकाराना ऑनलाईन निविदा सादर करण्यासाठी ना परतावा **रू.10,000 /–( अक्षरी रूपये दहा हजार फक्त )** इतकी निविदा शुल्क ऑनलाईन वरिल संकेतस्तळावर ऑनलाईन द्वारा भरणा करावी लागेल.
- निविदाचे संपुर्ण वेळापत्रक https://mahatenders.gov.in या संकेतस्तळावर उपलबध आहे.
- अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, अलिबाग-रायगड यांना निविदेतील अटी व शर्तीमध्ये वेळापत्रकात आवश्यकतेनुसार बदल करण्याचे आणि कोणतेही कारण न देता निविदा नाकारण्याचे अधिकार स्वत:कडे राखून ठेवले आहेत.
- कोणतेही कारण न दाखविता एक किंवा सर्व ई–निविदा स्विकारण्याचा वा नाकारण्याचा हक्क अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, अलिबाग-रायगड यांनी राखून ठेवला आहे.
- बयाणा रक्कम **रू. 2,00,000 /– ( अक्षरी दोन लाख फक्त )** ऑनलाईन भरावी लागेल.
- सदरील सेवा बाहयस्त्रोतामार्फत काम करुन घेण्यासाठी व निव्वळ कंत्राटी तत्वावर आहे. ही कोणतीही शासकीय पदभरती नाही व यासाठी जे उमेदवार बाहयस्त्रोतामार्फत निवडले जातील हे कंत्राटदाराच्या आस्थापनेवर संबंधित कर्मचारी असतील याची नोंद निविदाधारकांनी घ्यावी.

अधिष्ठाता

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, अलिबाग-रायगड

| | |
|---|---|
| 01 | **ई–निविदा सेवेचा कालावधी** |
| | कंत्राटी पध्दतीनेची तांत्रिक/अतांत्रिक कामगारसेवा पुरवठयाचा कालावधी हा फक्त 11 महिन्याचा राहिल. काम समाधानकारक असल्यास दुसऱ्या व तिसऱ्या वर्षासाठी स्वतंत्र कार्यादेश देण्यात येतील. काम समाधानकारक नसल्यास तात्काळ करार रद्द करण्याचे अधिकार मा. अधिष्ठाता यांनी स्वःतकडे राखून ठेवला आहे. कंत्राटदारांना करार रद्द करावयाचा असल्यास 1 महिना पुर्वसूचना देणे बंधनकारक राहील. कंत्राटदाराने पुर्वसूचना दिली तरीही रुग्णसेवेच्या दृष्टीने कार्यवाही पुर्ण होईपर्यंत काम सुरु ठेवणे बंधनकारक राहील |
| **02** | **पात्रता निकर्ष** |
| 1 | निविदा स्विकारण्यासाठी सद्यस्थितीत भारतीय कायदेअंतर्गत ज्या संस्था व्यवसाय करण्यास सक्षम आहेत, अशा संस्थासाठी निविदा भरण्यासाठीची प्रक्रिया खुली राहील. तसेच शासकीय एजन्सी /महामंडळे / पालिका / विद्यापीठे /मंडळ/बँका या शासकीय एजन्सीने ज्या संस्थेला चालू कालावधीत, भ्रष्ट फसवणूक किंवा कोणत्याही अनैतिक व्यवसाय यामध्ये सहभागी असल्यामुळे अशा संस्थासाठी निविदा भरण्यासाठीच्या प्रक्रियेत अपात्र म्हणून घोषित केले आहे व त्यांची नोंद काळया यादित नोंदवीलेली आहे अशी संस्था हि निविदा भरण्यास अपात्र राहिल. |
| 2 | ज्या निविदाधारकाची/कंत्राटदाराची मनुष्यबळाच्या सेवा पुरविण्याचा व्यवसाय मागील किमान 3 वर्षापासून अस्तित्वात असणे आवश्यक आहे. ज्यांना शासकिय कार्यालयासाठी कामगारसेवा पुरवीण्याचा किमान 03 वर्षाचा अनुभव आहे व ज्यांची सरासरी वार्षिक उलाढाल किमान रुपये 1.00 कोटीपेक्षा जास्त आहे (वित्तीय वर्षे सन 2018–19, 2019–20 व 2020–21 या वर्षाकरिता) अशा निविदाधारकांच्या / कंत्राटदारांच्या निविदा विचारात घेतल्या जातील. या अटी पूर्ण न करणाऱ्या निविदाधारकांच्या निविदा अपात्र समजण्यात येवून त्या नाकारण्यात येईल. |
| 3 | ज्या निविदाधारकांच्या / कंत्राटदारांच्या संबंधित पोलिस स्टेशनमध्ये गुन्हा नोंद नसल्याचे चारीत्र प्रमाणपत्र संबंधित पोलिस स्टेशनचे चालू काळातील प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. सदरील अट पुर्ण न करणाऱ्या निविदाधारकांच्या निविदा अपात्र समजण्यात येऊन त्या नाकारण्यात येईल. |
| 4 | निविदा सादर करताना संबधीत दस्तऐवज / प्रमाणपत्रांच्या छायाप्रती स्वसाक्षांकीत /स्वप्रमाणित करुन सादर करणे आवश्यक आहे. |
| 5 | प्राप्त निविदा मुल्यमापन / सत्यापित करुन स्वतंत्रपणे निविदाधारकाव्दारे केलेले दावे मुल्यमापन करण्याचा अधिकार अधिष्ठाता कार्यालयास राहील. |
| 03 | **प्रस्तावित मनुष्यबळ पुरवठा करण्यांस इच्छुक असलेल्या निविदा धारकांनी/संस्थानी त्यांच्या निविदा दोन लिफाफा पध्दतीने ई–निविदा प्रणालीव्दारे सादर करावी.** |
| 1 | संस्थेचे विधीग्राहय नोदंणी प्रमाणपत्र /शॉप ॲक्ट प्रमाणपत्र |
| 2 | जी. एस. टी. विधीग्राहय नोंदणी प्रमाणपत्र . मे, २०२२ पर्यंत |
| 3 | भविष्य निर्वाह निधी विधीग्राहय नोंदणी प्रमाणपत्र |
| 4 | आयकर नोंदणी विधीग्राहय प्रमाणपत्र |
| 5 | ई. एस. आय. सी नोंदणी प्रमाणपत्र |
| 6 | लेबर परवाना प्रमाणपत्र किमान 200 कर्मचारी यांची नोंद असणे बंधनकारक आहे. |
| 7 | मागील 3 वर्षाचे (2019–20, 2020–21,व 2021–22) वार्षिक उलाढाल प्रमाणपत्र. सोबतच्या **प्रपत्र क. 3** मध्ये भरुन सादर करावे. |

| | |
|---|---|
| 8 | लेखापाल यांचेकडील मागील दोन वर्षाचा नफा–तोटा पत्रक |
| 9 | सन 2021–22 या वित्तीय वर्षाचे आयकर भरल्याचे प्रमाणपत्र. |
| 10 | सन 2021–22 या वित्तीय वर्षाचे जी. एस. टी भरल्याचे प्रमाणपत्र. |
| 11 | शासकीय रूग्णालयात किमान एक वर्ष मनुष्यबळ सेवा पुरविल्याबाबत अनुभवाचे प्रमाणपत्र व सद्या सेवा देत असलेल्या संस्थांची माहिती **प्रपत्र क–02** मध्ये सादर करावी. |
| 12 | रू.100/– चे बॉन्ड पेपरवर शासकिय अथवा अशासकीय संस्थने निविदा धारकास मागील 3 वर्षामध्ये ब्लॅक लिस्टमध्ये टाकले नाही याचे प्रतिज्ञापत्र. |
| 13 | निविदा धारकाला त्यांचेकडे उपलब्ध असलेल्या मनुष्यबळाचा तपशिल सोबत जोडलेल्या **प्रपत्र क. 5** मध्ये भरून सादर करणे आवश्यक आहे. |
| 14 | निविदा धारकाला त्यांच्या संस्थेची माहिती सोबत जोडलेल्या **प्रपत्र क. 6** मध्ये भरून सादर करणे आवश्यक आहे. बैकव्दारे कर्मचारी यांचे बँकेच्या शिफारसी सही स्टॅटमेंन्ट व ESI, PF,ECR कॉपी जोडणे ( मागील महीन्याचे ) |
| 15 | बयाना रक्कम रू. 2,00,000/– अक्षरी रू दोन लाख मात्र एवढी रक्क्म प्रशासकीय अधिकारी यांचे स्टॅट बँक आफ ईडिया,मुख्य शाखा अलिबाग-रायगड खाते क्रं.<br>**Bank Name – State Bank of India**<br>**Account Holder Name – Administrative Officer" Government Medical College, Alibag, Dist. Raigad**<br>**Account No – 40226804779**<br>**IFSC Code – SBIN0000308**<br>**Branch – Alibag – Raigad**<br>---------------------------------------------------------------------------<br>व निविदा फॉर्म शुल्क रू.10,000/– दहा हजार मात्र ऑनलाईन पध्दतीने<br>**Bank Name – State Bank of India**<br>**Account Holder Name – "Dean" Government Medical College, Alibag, Dist. Raigad**<br>**Account No – 40226804598**<br>**IFSC Code – SBIN0000308**<br>**Branch – Alibag - Raigad**<br>जमा केल्याची पावती सादर करणे आवश्यक आहे. |
| 16 | सहकारी संस्था असल्यास ठरावाची प्रत, व सहाय्यक निबंधक सहकारी संस्था यांचे मा. अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालय, अलिबाग-रायगड यांचे नावाने अनुमती प्रत जोडणे आवश्यक आहे. तसेच सहकारी संस्था असल्यास कार्यक्षेत्रा बाबतचा पुरावा जोडावा. अन्यथा निविदा त्या संस्थेची निविदा रद्द करण्यांत येईल. |
| 17 | अधिष्ठाता, शासकीय वैदयकीय महाविदयालय,अलिबाग–रायगड यांच्या नावे राष्ट्रीयकृत बैंकची किमान एक कोटी रुपये असलेली बैंक सोलोन्सी आवश्यक आहे. |
| **03–ब** | **व्यापारी लखोटा कमांक–2** |
| 1 | व्यापारी लखोटा **प्रपत्र क.–7** नुसार ऑन लाईन पध्दतीने प्रति कर्मचारी प्रतिमहा (सर्व करासहित) नुसार सादर करावा. |
| 2 | व्यापारी लखोटा **प्रपत्र क.–7** नुसार सिलबंद लखोटयामध्ये ऑनलाईन सादर करणे बंधनकारक आहे. तसेच हस्तपोच अथवा टपालाव्दारे स्विकृत केले जाणार नाही. |

| | |
|---|---|
| **04** | **मनुष्यबळ पुरवठासेवा कामाचे व्याप्ती व स्वरूप** |
| 1 | शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अलिबाग येथील मा. अधिष्ठाता यांचे कार्यालय, विविध विभाग, प्रशिक्षण संस्था, व मुलांचे वसतीगृह येथे एकूण शिपाई 18, ( सफाईगार 195, सुरक्षासेवक 45 व कक्षसेवक 210 रुग्णालयाकरिता ) इतक्या मनुष्यबळाचा पुरवठा करावयाचा आहे. |
| 2 | प्रत्येक शिपाई, ( सफाईगार, सुरक्षासेवक व कक्षसेवक रुग्णालयाकरिता ) यांना 8 तासाचे शिप्ट प्रमाणे काम करावे लागेल. |
| 3 | प्रस्तावीत मनुष्यबळ संख्या आवश्यकतेनुसार भरण्यांत येतील. त्यामुळे मनुष्यबळाची संख्या कमी अथवा जास्त होण्याची शक्यता आहे. |
| 4 | प्रस्तावित मनुष्यबळातील कक्षसेवक यांना दैनंदिन रूग्णालयात दाखल रूग्णांची सेवा तसेच रूग्णउपयोगी कामे करणे बंधनकार राहील. |
| **05** | **निविदा वैद्यता कालावधी** |
| | दर लिफाफा उघडण्याच्या पासून निविदा 90 दिवसांच्या कालावधीसाठी स्विकृत व वैध असेल आणि त्यांनतर तोपर्यंत निविदाधारक लेखी सूचना देवून निविदा लेखी मागे घेवू शकत नाही. कमी कालावधीची वैध निविदा प्रतिसाद नसलेली निविदा म्हणून नाकारली जाईल. |
| **06** | **मुल्यमापन समिती** |
| | मा. अधिष्ठाता कार्यालयाने गठीत केलेल्या समिती मार्फत निविदा मुल्यमापन होईल, तांत्रिक व दर/वित्तीय निविदेसाठी मुल्यमापन समितीचा निर्णय अंतिम असेल.सदर कालावधी किमान 90 दिवसाचा असेल. |
| **07** | **तांत्रिक निविदा खुल्या करणे/उघडणे** |
| | तात्काळ निविदा बंद झाल्यानंतर आणि निर्धारित केलेली वेळ व कोणत्याही क्षणी निविदा प्राधिकरण / अधिष्ठाता कार्यालयास निर्दिष्ट केलेल्या वेळापत्रकाशिवाय निविदा उघडू शकणार नाही. |
| **08** | **निविदेचे स्पष्टीकरण** |
| | निविदा मुल्यमापन दरम्यान, निविदा प्राधिकरण त्याच्या निर्णयावर अवलंबून निविदा धारकाला या निविदेबाबतचे स्पष्टीकरण विचारु शकेल. स्पष्टीकरणाची विनंती अणि प्रतिसाद ऑनलाईन स्वरुपात 2 दिवस राहील आणि दर किंवा निविदेतील महत्वाच्या बाबीमध्ये काहीही बदल होणार नाही किंवा स्विकारले जाणार नाही. |
| **09** | **निविदेची छाननी** |
| | प्राथमिक छाननी करताना निविदा पूर्ण आहेत की नाही हे निश्चित करण्यात येईल. कोणत्याही त्रुटी केल्या गेल्या आहेत की नाही, आवश्यक बयाणा रक्कम परिपूर्ण आहेत की नाही, दस्तऐवज योग्यप्रकारे स्वाक्षरी केलेले आहे किंवा नाही, निविदा क्रमाने भरणा केलेली आहे किंवा नाही. तसेच दिलेली माहिती खरी आहे की नाही इ. |
| **10** | **मुल्यमापन प्रक्रिया** |
| 1 | तांत्रिकमुल्य हे गठीत/नामांकन केलेल्या समितीमार्फत मुल्यमापन प्रक्रिया करण्यात येईल. तांत्रिक मुल्यनिर्धारण पूर्णपणे निविदा धारकाची संपूर्ण माहिती, मागीलआढावा आणि सामग्री यांवर अधारित असेल. |
| 2 | तांत्रिक मुल्यांकनामध्ये समितीचा निर्णय अंतिम राहील. याबाबत कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार, वाटाघाटी/चर्चा समितीबरोबर करता येणार नाही. |
| 3 | तांत्रिक मुल्यांकनामध्ये पात्र ठरलेल्या निविदाधारकांच्याच आर्थिक निविदा उघडण्यात येतील |

| | |
|---|---|
| **11** | **वित्तीय/आर्थिक निविदा उघडणे** |
| | वरिलप्रमाणे फक्त तांत्रिक निविदेत पात्र झालेल्या निविदाधारकांचीच दर निविदा उघडण्यात येतील. |
| **12** | **वित्तीय/आर्थिक निविदा उघडण्याची वेळ** |
| | तांत्रिक निविदेत पात्र निविदाकारांच्या दर निविदा गठीत समिती मार्फत उघडण्यात येतील. सदर निविदा उघडण्याची तारिख व वेळ पात्र निविदाकारांना कळविण्यात येईल. |
| **13** | **दर निविदा उघडणे** |
| 1 | निविदा प्राधिकरण / समिती समोर योग्य ते दर असलेला निविदाधारकाकडून प्रभावी स्थिर आणि आर्थिक दृष्टया योग्य अपेक्षा पूर्ण करण्यासाठी वाटाघाटी करेल. |
| 2 | जर एक निविदाधारक तांत्रिक निविदामध्ये पात्र ठरला किंवा एका निविदेचा प्रतिसाद आला तर प्रस्तुत निविदेवर नियमानुसार कार्यवाही / निर्णय घेणेबाबत सर्व अधिकार मा. अधिष्ठाता यांनी राखून ठेवले आहेत. |
| **14** | **दर/वित्तीय निविदा आणि कार्यादेश निकष मुल्यमापन** |
| 1 | दर निविदा ही प्रभावी खर्चाच्या आधारावर मुल्यांकित केली जाईल. निविदाधारकाचा दर देकार हा त्याच्या आर्थिकदृष्टया योग्यतेच्या अधिनतेने निर्धारित करुन निवडण्याचा अधिकार अधिष्ठाता कार्यालयाचा राहील. |
| 2 | योग्य व सर्वात कमी दर देणारा निविदाधारक दर निविदा दस्तऐवज उल्लेख देयकानुसार एकुण खर्चाच्या आधारित काढले जाईल. |
| 3 | योग्य व सर्वात कमी दर निविदा सादर करणाऱ्या निविदाधारकास निर्धारित करुन निवडण्यात येईल व त्यास कंत्राट दिले जाईल. |
| **15** | **निविदा कार्यालयास संपर्क** |
| 1 | निविदा उघडण्यापासून कंत्राट देईपर्यंत निविदाधारक त्याच्या निविदासंबंधी कोणत्याही प्रकारच्या बाबीसाठी निविदा कार्यालयाबरोबर संपर्क करणार नाही. जर निविदा कार्यालयाला त्याच्याकडून अतिरिक्त माहिती देऊ इच्छित असेल तर तशी लेखी सूचना कळविणे आवश्यक आहे. अशी अतिरिक्त माहिती विचार करणे किंवा ती नाकरण्याचा अधिकार प्राधिकरण / समितीने राखून ठेवला आहे. |
| 2 | जर निविदाधारकाने प्राधिकरण / समितीच्या निविदा मुल्यमापन तुलनेत किंवा त्याचा परिणाम कंत्राट देण्याच्या निर्णयावर प्रभावी प्रयत्न/वर्चस्व दाखवल्यास निविदाधारकाला या प्रक्रियेतून अपात्र ठरविण्यात येईल व त्याचे बयाणा रक्कम जप्त होईल. |
| **16** | **निविदा स्वीकृती** |
| | सर्वात कमी किंवा इतर कोणत्याही निविदा स्वीकारण्यास निविदा प्राधिकरण स्वत: बांधील राहणार नाही. निविदा प्राधिकरण कोणत्याही एक निविदा स्वीकारणे किंवा सर्व निविदा नाकारण्याचा अधिकार राखून ठेवत आहे. |
| **17** | **कार्यक्षमतेबद्दल सुरक्षा ठेव रक्कम/आणि करारावर स्वाक्षऱ्या** |
| 1 | सुरक्षा ठेव रक्कम ही एकुण कंत्राटाच्या अंदाजे 3 टक्के इतकी असेल. |

| | |
|---|---|
| 2 | प्रदान कामगीरी सुरक्षा / सुरक्षा ठेव भारतीय रुपयामध्ये होईल व ती बँक हमी स्वरुपात राष्ट्रीय/अनुसूचित बँकाकडून जारी/प्रमाणित केलेले असेल. |
| 3 | कंत्राट कालावधी/मुदतवाढ कालावधी संपुष्टात आल्यानंतर तीस(30) दिवसात कामगिरी सुरक्षा/सुरक्षा ठेव रक्कम निविदाधारकाच्या विनंतीअर्जानुसार निविदा प्राधिकरण परत करेल. |
| 4 | निविदाधारक या दस्तऐवजात प्रस्तावित केल्यानुसार (कंत्राटी शर्ती) करार करण्यास अयशस्वी ठरल्यास व देकार पत्राव्दारे सुधारित स्पष्ट किंवा दुरुस्त केल्यास देकार विलोपन व निविदा सुरक्षा जप्त करणे या पुरेसा कारणास्तव निविदा प्राधिकरण तो देकार समान दरामध्ये दुसऱ्या निविदाधारक तयार असेल त्यास देईल किंवा नविन निविदा प्रक्रिया राबविल. |
| **18** | **अटी व शर्तीना बांधिल** |
| | निविदा आणि करार देकार प्रक्रिया संबधीत निविदा प्राधिकरणाने घेतलेले सर्व नियम अंतिम आणि संबधीत सर्व पक्षांना बंधनकारक असेल निविदा प्राधिकरण याचे सर्व अधिकार राखून ठेवत आहे. |
| | सुधारित बदल, सुधारणा किंवा निविदेतील कोणत्याही अटी व शर्ती मध्ये बदलांचे निविदा प्राधिकरण याचे सर्व अधिकार राखून ठेवत आहे. |
| **19** | **निविदा धारकाची जबाबदारी** |
| 01 | निविदा मंजूर झाल्यावर यशस्वी निविदा धारकाला रू. 100/– चे बॉन्ड पेपरवर विहित नमुन्यात निविदेतील सर्व अटि व शर्ती मान्य असल्याबाबत करारनामा करून द्यावा लागेल. |
| 02 | यशस्वी निविदा धारकानी सुरक्षा ठेव म्हणून ठेवलेली रक्कम ही निविदा कालावधी संपुष्टात आल्यानंतर 60 दिवसात परत करण्यांत येईल. तथापी प्रस्तुत रक्कमेवर कोणतेही व्याज दिले जाणार नाही. |
| 03 | मनुष्यबळाचे काम करणेसाठी 18 ते 45 वर्ष वयातील कर्मचारी नियुक्त करणे बंधनकारक आहे. |
| 04 | यशस्वी निविदा धारकाला मनुष्यबळासाठी नेमण्यांत आलेल्या कर्मचा–यांना गणवेशाचा पुरवठा करावा लागेल. गणवेश परिधान केल्याशिवाय कर्मचा–यांना काम करणेसाठी मनाई करण्यांत येईल. |
| 05 | यशस्वी निविदा धारकाला मनुष्यबळासाठी नेमण्यांत आलेल्या कर्मचा–यांना आरोग्याचे दृष्टीने ॲप्रन, मास्क, व ग्लोज इ. चा पुरवठा करावा लागेल. शासकीय महाविद्यालयाकडून कोणतेही साहित्य अथवा डिस्पोजेबल साहित्यांचा पुरवठा होणार नाही. |
| 06 | यशस्वी निविदा धारकाला मनुष्यबळासाठी नियुक्त केलेल्या कर्मचा–यांना किमान वेतन कायदा अधिनियम 1948 अन्वये वेतन अदा करावे लागेल. किमान वेतन कायदा अधिनियम 1948 अन्वये कमी वेतन दिलेले आढळून आल्यास सदरची निविदा रद्द करणेत येवून निविदा धारकास काळया यादीत टाकण्यात येईल. |
| 07 | निविदा धारकाने महाराष्ट्र शासन, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय कमांक संकिर्ण–2019/प्र.क. 13/कामगार–8/दिनांक 22 फेब्रुवारी 2019 अन्वये कर्मचा–यानी केलेल्या केलेल्या कामाच्या दिवसांनुसार महिन्याकाठी कंत्राटदाराने सबंधीत कर्मचां–याचे वेतनातून वैधानिक देणी (भविष्य निर्वाह निधी ( P.F),राज्य कामगार विमा योजना,(ESIS)नुकसान भरपाई, (W.C)व्यवसायकर, (P.T ) इ. ) वजावटी कापून घेवून सबंधित कर्मचाऱ्यांच्या वैधानिक देणी जमा करण्यांच्या खात्यामध्ये जमा कराव्या लागतील. |
| 08 | निविदा धारकाला मनुष्यबळासाठी पुरवठा केल्याचे कर्मचा–यांचे मासिक देयक कार्यालयास सादर करताना त्यासोबत महाराष्ट्र शासन, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय कमांक संकिर्ण–2019/प्र.क. |

| | |
|---|---|
| | 13/कामगार–8/दिनांक 22 फेब्रुवारी 2019 अन्वये (01) एकत्रित वेतन (02) नाव व पदनामासह कर्मचा–यांच्या वेतन व वैधानिक देण्यांसह तपशिल (03) कर्मचा–यांचा उपस्थितीबाबतचे हजेरीपत्रक (04) भविष्य निर्वाह निधी ( P.F),राज्य कामगार विमा योजना,(ESIS) नुकसान भरपाई, (W.C)व्यवसायकर, (P.T ) ) इ. वैधनिक देणी अदा कल्याच्या पावत्या (05) एकत्रित वेतनचिठ्ठया सादर कराव्या लागतील. प्रस्तुत कागदपत्रे मासिक देयकासोबत सादर केल्याशिवाय सबंधित कंत्राटदास मासिक देयकाची रक्कम अदा केली जाणार नाही. |
| 09 | यशस्वी निविदा धारकाला नेमलेल्या कंत्राटी कामगारानां कामाचे वेतन व त्यानुषंगीक सर्व भत्ते रोख स्वरुपात अदा न करता RTGS **बॅके** व्दार**च** अदा करणे बंधनकार राहील. |
| 10 | यशस्वी निविदा धारकाला संबंधीत कंत्राटी कर्मचा–यांचे वेतन RTGS व्दारे अदा केल्याबाबतची माहिती प्रति महा कार्यालयास सादर करावी लागेल. सदरची माहिती सादर न केल्यास शासकीय महाविद्यालय, अलिबाग यांचेकडून वेतन देयक अदा केले जाणार नाही. |
| 11 | यशस्वी निविदा धारकाला मनुष्यबळासाठी नियुक्त केलेल्या कर्मचा–यांचे वेतन दरमहा 10 तारखेच्या आत **संबंधीत कर्मचारी यांच्या खात्यावर अदा** करणे बधंनकारक आहे. |
| 12 | मनुष्यबळाची सेवा पुरवठा करताना कोणतीही दुर्घटना झाल्यास व कंत्राटी कर्मचा–यास दुखापत /मृत्यु झाल्यास सदरची नुकसान भरपाई/मोबदला देण्याची संपूर्ण जबाबदारी निविदा धारकाची राहील.तसेच सदर प्रकरणी न्यायप्रविष्ठ बाबी अथवा वाद निर्माण झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी ही निविदा धारकाची राहील. त्या अनुषंगाने कंत्राटी कर्मचा–यांचा नियमानुसार योग्य त्या इन्शुरन्स (विमा) करण्याची जबाबदारी ही निविदा धारकाची राहील. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अलिबाग कोणतीही जबाबदारी घेणार नाही. |
| 13 | ईएसआयसी व पी. एफ भरण्याची संपूर्ण जबाबदारी ही निविदा धारकाची राहील. याबाबत मा. अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अलिबाग, जिल्हा रायगड यांचा संबंध राहणार नाही. |
| 14 | मनुष्यबळ सेवा पुरविणेकरिता नियुक्त केलेले कर्मचारी हे शाररीक, मानसिक व वैद्यकीय दृष्टया सक्षम असणे क्रमप्राप्त आहे. |
| 15 | निविदा धारकानी पुरवठा केलेले कर्मचारी हे कंत्राटी पध्दतीने असल्याने त्यांना शासकीय सेवेत असल्याचा कोणताही लाभ मिळणार नाही. तसेच त्यांना नियमीत शासकीस सेवेवर हक्क सांगता येणार नाही. |
| 16 | निविदा धारकाने स्वच्छतेसाठी नियुक्त केलेल्या कंत्राटी कर्मचा–यांना आठवडयातून किमान एक दिवस साप्ताहिक सुट्टी द्यावी लागेल. तथापी त्यांच्या सुट्टीच्या कालावधीत पर्यायी कर्मचा–यांची नियुक्ती करावी लागेल. |
| 17 | यशस्वी निविदा धारकानी नियुक्त केलेल्या कंत्राटी कर्मचा–यांनी **आवश्यक** वेळी स्वच्छतेचे काम न केल्यास अथवा मनुष्यबळ सेवेच्या कामात खंड पाडल्यास सदरचे काम स्थानिकरित्या करून घेवून त्यासाठी येणारा खर्च हा निविदा धारकाच्या सुरक्षा ठेव म्हणून घेतलेल्या रक्कमेतुन **अथवा देयकातुन** अदा करण्यांत येईल. |
| 18 | मनुष्यबळाची सेवा पुरविणेसाठी नियुक्त करण्यांत येणा–या कर्मचा–यांचे किमान शिक्षण खाली नमुद केल्याप्रमाणे राहील.तसेच कर्मचा-याचे वय १८ ते ४३ दरम्यान असावे सदर पदानुसार करावयाच्या कामासाठीचे संबंधीत कर्मचा-यास अनुभव/कामाची माहिती असणे आवश्यक राहिल. |

| अ.क्र. | पदाचे नाव | शैक्षणीक पात्रता |
|---|---|---|
| 1 | शिपाई (एक शिफ्ट 08 तास सेवा) | S.S.C School Pass Certificate Examination |
| 2 | कक्षसेवक (एक शिफ्ट 08 तास सेवा) | S.S.C School Pass Certificate Examination |
| 3 | सफाईगार (एक शिफ्ट 08 तास सेवा) | स्वच्छक व सफाईगार पदासाठी मान्यता प्राप्त शाळेतून इयता ७ वी उत्तीर्ण केलेली असावी. |
| 4 | सुरक्षा रक्षक (एक शिफ्ट 08 तास सेवा) | S.S.C School Pass Certificate Examination |

| | |
|---|---|
| 19 | सेवा पुरविणाऱ्या कंत्राट कामगारांच्या कंत्राटदारास कोणताही फायदा/वेतन/सेवेत सामावून घेणे/सेवेत नियमित करता येणार नाही. तसे प्रतिज्ञापत्र सेवा पुरविणाऱ्या कंत्राटदाराने सदर कर्मचाऱ्याकडून घेवून |

| | |
|---|---|
| | अधिष्ठाता कार्यालयास दयावे. सदर कर्मचाऱ्याच्या औद्योगिक कायदा1947 किंवा कंत्राटी कामगार कायदा 1970 अंतर्गत कोणताही फायदा होणार नाही. |
| **20** | **शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाकडून पुरविण्यांत येणा–या बाबी.** |
| 01 | शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे निविदा धारकानी नियुक्त केलेल्या कंत्राटी कर्मचा–यांना निविदाधारकामार्फत ओळखपत्र देण्यांत येईल. |
| **21** | **निविदा प्रक्रियेत बदलाबाबत** |
| 01 | सक्षम प्राधिकारी हे निविदेमध्ये काही बदल करावयाचे असल्यास सदर ई–निविदेच्या अंतिम दिनांक व वेळेपुर्वी शुध्दीपत्रकाव्दारे बदल करू शकतात. सदर बदल हे ग्राहय मानले जातील व त्यामुळे निविदा सादर करणेस अतिरीक्त कालावधी वाढविण्याचा हक्क सक्षम प्राधिका–याने राखून ठेवला आहे. याबाबतची माहिती अधिकृत संकेत स्थळावरुन प्रसिध्द केली जाईल व ती माहिती ई–निविदा भरू इच्छिणा–याना बंधनकारक राहील. |
| **22** | **ई–निविदेच्या गोपनीयतेबाबत** |
| 01 | निविदा धारकानी सादर केलेली कागदपत्रे तपासणी झाल्यानंतर, सदर बाबतची स्पष्टीकरण व न्युनत्तम दराचा तुलनात्मक तक्ता समितीची शिफारशी तसेच निविदा प्रक्रिये बाबतची कोणतीही माहिती निविदाधारकास अथवा जे निविदा प्रक्रियेत सहभागी झाले नाहीत अशा कोणत्याही व्यक्तीस अथवा संस्थेस देता येणार नाही. अथवा याबाबत हक्क सांगता येणार नाही. व सदरची माहिती गोपनिय राहील. ऑनलाईन असल्यामुळे सर्व प्रक्रिया ऑनलाईन राहील याची नोंद घ्यावी. |
| **23** | **ई–निविदेच्या इतर अटि व शर्ती** |
| 01 | प्रस्तावीत मनुष्यबळाची सेवा वाढविण्याचा अथवा नविन समाविष्ठ करण्याचा अधिकार हा मा. अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, अलिबाग यांना राहील. |
| 02 | प्रस्तावीत मनुष्यबळ सेवेची मासिक देयक हे शासनाकडून मंजूर होणा–या अनुदान उपलब्धतेवर अवलंबून आहे. अनुदान उपलब्ध नसल्यास निविदा धारकाला दैनंदिन स्वच्छता सेवा खंडीत करता येणार नाही. तसेच स्वच्छतेसाठी नियुक्त केलेल्या कर्मचा–यांचे मासिक वेतन थकविता येणार नाहीत. तसे आढळून आल्यास शासकीय नियमानुसार योग्यती कारवाई करण्यांत येईल व त्याची संस्था ब्लॅकलिस्ट मध्ये टाकण्यांत येवून पुढील कालावधीसाठी त्यांच्या निविदा ग्राहय धरल्या जाणार नाहीत. |
| 03 | प्राप्त झालेल्या निविदांपैकी कोणतीही निविदा किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अथवा मनुष्यबळ सेवेचे कर्मचारी कमी अथवा अधिक करण्याचा अधिकार मा. अधिष्ठाता यांनी राखून ठेवला आहे. |
| 04 | वेळोवेळी वरिष्ठ कार्यालयाकडून , शासनाकडून अथवा मा. न्यायालयाकडून निर्गमित होणारे आदेश मनुष्यबळाची सेवा पुरविणा–या संस्थेस बंधनकारक राहतील. |
| 05 | मनुष्यबळाची सेवा शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाच्या अधिका–यांकडून अथवा त्यांनी नियुक्त केलेल्या इतर कर्मचा–याकडून अचानक पहाणी करण्यांत येईल. व काही त्रृटी आढळून आल्यास लेखी समज देण्यांत येवून कामात सुधारणा करण्याचे आदेश निर्गमित करण्यांत येतील. त्यानुसार दैनंदिन स्वच्छता सेवेत योग्यत्या सुधारणा करणे निविदा धारकाला बंधनकारक राहील. |
| 06 | निविदा धारकानी सादर केलेल्या सर्व कागदपत्रांच्या पानावर त्यांची सही व शिक्का असणे आवश्यक आहे. तसेच सहकारी संस्था असल्यास चेअरमन यांची सही असणे आवश्यक आहे.त्याशिवाय निविदेचा विचार केला जाणार नाही. |

| | |
|---|---|
| 07 | निविदा धारकानी शासकीय रूग्णालयात यापुर्वी केलेल्या कामाची माहिती सोबत जोडलेल्या **प्रपत्र क. 2** मध्ये भरून सादर करणे आवश्यक आहे. |
| 08 | निविदा धारकानी सोबत जोडलेल्या **प्रपत्र क. 4** मध्ये नमुद केल्याप्रमाणे शपथपत्र रू. 100/— चे स्टॅम्प पेपरवर तयार करून नोटरी करून सादर करणे बंधनकारक आहे. |
| 09 | निविदा कार्यालयाच्या मागणीनुसार निविदा अंतर्गत निविदा/पुरवठादार/कंत्राटदार अशा करारामध्ये खरेदी आणि अंमलबजावणी दरम्यान आचारसंहेतेची सर्वाधिक मानके न चूकता पाळणे आवश्यक आहे. |
| 10 | जर निविदाधारकाला कंत्राट देण्याची शिफारस होताना तो भ्रष्टाचार किंवा फसवणूकीच्या प्रकरणात गुंतलेला असल्याचा दृढनिश्चय झाल्यास अधिष्ठाता कार्यालय त्याची निविदा रद्य करेल. |
| 11 | जर निविदा धारक कंपनी यामध्ये स्पर्धेसाठी किंवा कंत्राटामध्ये भ्रष्टाचार आणि फसवणूकीचा प्रयत्न केल्याचे निश्चित झाल्यास अधिष्ठाता कार्यालय कोणत्याही वेळी त्या निविदा धारक कंपनीला एकतर अनिश्चित किंवा नमूद कालावधीसाठी अपात्र ठरवेल. |
| 12 | काल्पनिक संदिग्ध, एकत्र गटबाजी करुन किंवा सशर्त प्रकाराच्या निविदा नाकरल्या जातील. निविदेमध्ये कोणत्याही प्रकाराचा किंवा परिशिष्टातील नमून्यात कोणताही बदल केला जाणार नाही अपुरी माहिती किंवा नमून्यात बदल केल्यास निविदेत अपात्र होऊ शकतो. |
| 13 | यशस्वी निविदा धारक निविदा दस्तऐवजामधील आवश्यक अटी व शर्तीचे पालन करण्यास अयशस्वी ठरल्यास या पुरेशा कारणास्तव देकार रद्य होईल आणि निविदा सुरक्षा जप्त होईल त्यानंतर दुसऱ्या निविदाधारकास कार्यारंभ/कार्यादेश देण्याचा व नविन निविदा प्रक्रिया राबविण्याचा सर्वस्वी निर्णय प्राधिकरण/ समितीचा राहील. |
| 14 | जर निविदा किंवा करार दस्ताऐवजातील कलमांचा अर्थ स्पष्ट करण्यास कोणत्याही संदिग्धते बाबतीत निविदा प्राधिकरणाने / समितीने स्पष्ट केलेल्या कलमांचा अर्थ सर्व पक्षाकारांना व निविदेतता धारककांना बंधनकारक राहिल. |
| 15 | कंत्राटदाराकडून कोणत्याही प्रकारचे नुकसान झाल्यास परिणामी कंत्राटदार जबाबदाऱ्या पूर्ण करण्यास अपयशी ठरल्यास प्रदान कामगीरी सुरक्षा रकमेतून नुकसान भरपाई म्हणून निविदा प्राधिकरणाला देय राहिल. असमाधानकारक कंत्राटीसेवा दिल्यास प्रदान कामगिरी सुरक्षा/सुरक्षा ठेव रक्कम गमावली जाईल आणि यातून कोणालाही सूट राहणार नाही. |
| 16 | निविदाधारकाकंडून पुरविण्यात येणाऱ्या सेवेमध्ये करारातील सामान्य व्यप्ती बदल्याकरिता निविदा प्राधिकरण कोणत्याही वेळी लेखी आदेश कंत्राटदार निविदाधारकास देईल. |
| 17 | करारा दरम्यान कंत्राटदार/विक्रेता हा होणाऱ्या कोणत्याही आर्थिक समस्येसाठीपूर्णपणे जबाबदार असेल. सदोष सेवेमुळे निविदा प्राधिकरणास/या संस्थेस कोणतेहीआर्थिक नुकसान उद्भवल्यास परिणामकंत्राटदार/विक्रेता जबाबदार असेल व कंत्राटदार/विक्रेता पूर्ण करेल. म्हणून निविदा करार संपुष्टात येण्यास कंत्राटदार/विक्रेता जबाबदार असेल व या उद्भवलेल्या सर्व दाव्यांचे निराकरण कंत्राटदार/विक्रता पूर्ण करेल. |
| 18 | वेतनाचे नियोजन दिलेल्या सेवेच्या अनुषंगाने देय राहील. |

| | |
|---|---|
| 19 | मनुष्यबळ सेवा पुरवठादाराने / कंत्राटदाराने नेमणूक केलेले कामगार यांचे परिश्रमीक व भत्ते देण्याची जबाबदारी सर्वस्वी मनुष्यबळ सेवा पुरविण्याऱ्या पुरवठादार / कंत्राटदाराची राहील. या विषयी आधिष्ठाता कार्यालयाची कुठलीही जबाबदारी राहणार नाही. |
| 20 | कंत्राटदाराकडील मनुष्यबळ सेवा कामगारांना करारात ठरल्याप्रमाणे वेळेत वेतन देणे आवश्यक आहे सदर कामात कोणत्याही प्रकारे उशिर होणार नाही याची जबबादारी सर्वस्वी कंत्राटदाराची असेल. वेतन वेळेत न दिल्यास सदर महिन्याच्या देयकाच्या एकूण रकमेच्या प्रति दिन 0.5 टक्के दराने दंड आकारण्यात येईल. या बाबतचे सर्व अधिकार निविदा प्राधिकरण / अधिष्ठाता कार्यालयाने राखून ठेवले आहेत. |
| 21 | कंत्राटदारामार्फत पुरविण्यात येत असलेलया मनुष्यबळ सेवा असमाधानकारक असल्यास त्या कामगारावर आवश्यक ती कार्यवाही करण्याचे अधिकारी निविदा प्राधिकरणास / अधिष्ठाता कार्यालयास राहतील व या बाबतची सर्व जबाबदारी कंत्राटदारावर असेल, |
| 22 | निविदा प्राधिकरण कोणत्याही क्षणी दर–करार हा लेखी सूचना / नोटीस देऊन संपुष्टात आणू शकते. जर कंत्राटदारास बँकेने दिवाळखोर घोषित केल्यास अशा परिस्थितीत संपुष्टात येणारा करार हा कंत्राटदाराला कोणत्याही प्रकारचा मोबदला न देता आणि सदर संपुष्टात येणारा करार कोणत्याही प्रकारची अंतिम एकत्रित आलेली रक्कम न देता करण्यात येईल. |
| 23 | सुरक्षा अनामत रक्कम कोणत्याही क्षणी जप्त करण्याचा अधिकार हा निविदा प्राधिकरणाला असणार व सदर निविदा कार्यादेश झाल्यापासून जर कंत्राटदार ठरविलेल्या वेळापत्रकात कार्याचा आरंभ केला नसल्यास सुरक्षा अनामत रक्कम जप्त करण्याची जबाबदारी निविदाप्राधिरणावर असेल तसेच अशा परिस्थितीत निविदा प्राधिकरण सदर सुरक्षा रकमेचा वापर दुसऱ्या कंत्राटदाराकडून काम करुन घेण्यास करेल. दुसऱ्या कंत्राटदाराकडून काम करुन घेताना फरकाची रक्कम ही निविदा प्राप्त कंत्राटदाराकडून वसूल करण्यात येईल. त्यात करही वसूल करण्यात येतील. |
| 24 | कोणताही वाद किंवा करारासंबंधात उद्‌भवलेला विवाद निविदा प्राधिकरण व कंत्राटदार थेट औपचारिक रितीने व सर्वतोपरी निरिकरण करण्याचे प्रयत्न करतील. |
| 25 | जर औपचारिक वाटाघाटित 30 दिवसानंतर निविदा प्राधिकरण व कंत्राटदार यांच्यामधील उद्‌भवणारे सर्व विवाद, फरक, दावे व मागण्याचे निराकरण करण्यास अपयश आल्यास करारांमध्ये आपआपसातील संमतीने एकमेव लवादाची नियुक्ती करतील. सर्व लवादा संदर्भातील प्रकरणे अलिबाग कार्यक्षेत्रात होतील. |
| 26 | करार हा मराठी भाषेत लिहला जाईल. सर्व पत्रव्यवहार व इतर दस्तावेज जे की, कराराशी संबधीत आहेत ते त्याच भाषेत देवाण–घेवाण करतील. |
| 27 | कंत्राटदाराच्या सेवेबाबत तक्रारीसाठी आवश्यक ठिकाणी तक्रार नोंदवही बंधनकारक राहील |
| 28 | निविदा प्राधिकरणाच्या पूर्व लेखी परवानगी ठिकाण व मान्यतेशिवाय कंत्राटदार कोणताही दुय्यम कंत्राटदार किंवा कंत्राटदाराचा कोणताही भाग नेमणार नाही. |
| 29 | सर्व कायदेशीर वाद फक्त मा.न्यायलय अलिबाग–रायगड कार्यक्षेत्राचे अधीन राहील. |
| 30 | कंत्राटदाराने कार्यारंभ आदेश मिळाल्यापासून 15 दिवसांत, पुरविण्यात येणाऱ्या कामगारांची नावे, जन्मतारीख, अर्हता, आधार कार्ड इत्यादींची माहिती पुरवावी, तसेच अतिरिक्त मनुष्यबळाची आवश्यकता भासल्यास कमाल कामगारांच्या संख्येच्या आधीन राहून अतिरिक्त मनुष्यबळ पुरवठा लेखी सूचनेपासून सात दिवसांच्या आत पुरवणे बंधनकारक राहील. |
| 31 | सेवा पुरविणाऱ्या कंत्राटदाराच्या कामगारांनी अधिष्ठाता कार्यालयातील कोणतीही बातमी/कर्मचाऱ्याबाबतची माहिती तांत्रिक माहिती /सुरक्षेबाबतची माहिती /प्रशासकीय |

| | |
|---|---|
| | /संघटनात्मक बाबी किंवा अत्यंत गोपनीय बाबी कोणत्याही व्यक्तीला/संस्थेला देणे किंवा ज्ञात करणे यास पूर्ण प्रतिबंध राहील. |
| 32 | सेवा पुरविणाऱ्या कंत्राटदाराचे कामगार हे अत्यंत नम्र, सकारात्मक आणि प्राप्त कार्यक्षमतेचे प्रतिक असावेत आणि त्यांच्या कृतीमुळे अधिष्ठाता कार्यालयास कार्य व प्रतिमा उभारण्यास मदत होईल. सेवापुरविणाऱ्या कंत्राटदाराची प्राथमिक जबाबदारी ही त्यांच्या कर्मचाऱ्यांची वागणूक, वर्तणूक व शिष्टाचारी असेल |
| 33 | सेवा पुरविणाऱ्या कंत्राटदाराने त्याच्या कामगारांना आवारात अंमली पदार्थ, पान, दारु, धुम्रपान इत्यादीचे सेवन व कचरा न फेकणे इत्यादीबाबत आवश्यक त्या सूचना देईल. |
| 34 | अधिष्ठाता कार्यालयात अत्यंत अल्प कालावधीसाठी कोणत्याही प्रकारच्या कामागाराची गरज लागल्यास त्या कामगारांचा पुरवठा कंत्राटदार करेल. |
| 35 | कंत्राटदराने पर्यायी सुविधा / कामागार उपलब्ध करुन देणे, कोणताही कामगार त्यास दिलेले काम सोडून जात असल्यास त्याची योग्य ती माहिती अधिष्ठाता कार्यालयास देईल. |
| 36 | कंत्राटदारस फोन, ई–मेल, फॅक्स, विशेष दूत, लघु संदेशाव्दारे विचारण्यात आलेल्या समस्यांचे योग्य ते निराकरण कंत्राटदाराने करावे. |
| 37 | निविदा उघडण्याच्या तारखेपासून 120 दिवस निविदा वैध राहील. |
| 38 | निविदापूर्व बैठकीस किंवा निविदा उघडतेवेळी फक्त निविदाधारक किंवा प्राधिकृत प्रतिनिधी यांनाच उपस्थित राहण्याची परवानगी दिली जाईल. |

निविदा धारकाची सही व शिक्का

अधिष्ठाता
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय,
अलिबाग, जिल्हा रायगड

# प्रपत्र कमांक–1
# निविदा अर्ज

प्रति,

**मा. अधिष्ठाता,**
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय,
अलिबाग

**विषय :–मनुष्यबळस्वच्छता सेवा पुरविणे या कामाची निविदा अर्ज सादर करणेबाबत..**

महोदय,

उपरोक्त विषयानुसार आम्ही सर्व आवश्यक ती कागदपत्रे तपासून निविदेसोबत सादर करीत आहोत.( तांत्रिक लखोटयात मागणी केल्याप्रमाणे ) आम्ही खाली सही करणार यांनी निविदेतील सर्व नियम, अटि व शर्तीची माहिती असून त्या सर्व अटि व शर्ती आम्हाला बंधनकारक असून त्या आम्हाला मान्य आहेत. निविदेतील सर्व अटि व शर्ती वाचून आम्ही स्वच्छता सेवा पुरविणे या कामाची निविदा सादर केलेली आहे. वरील विषयांकिंत सेवेचा दर लखोटा क्र. 2 मध्ये .( ऑनलाईन पध्दतीने ) सादर केलेला आहे. लखोटा क्र. 2 हा निविदेचा अत्यंत महत्वाचा भाग आहे.

जर खाली सही करणार यांची निविदा मंजूर झाली तर निविदेत स्पष्ठ केल्याप्रमाणे कामाचे स्वरूप व व्याप्ती प्रमाणे तसेच सक्षम प्राधिका–याने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशाप्रमाणे सेवा देण्यास मी/आम्ही बांधील राहू व सदर बाबतीत आमची तक्रार असणार नाही.

मी, खाली सही करणार लिहून देतो की, मी, आजपर्यंत शासकीय कार्यालयात ई–निविदा भरताना माझे संस्थेच्या कागदपत्रात जसे वार्षिक उलाढाल प्रमाणपत्र ,आयकर प्रमाणपत्र व इतर कागदपत्रांमध्ये कमी जास्त दाखवून निविदा भरलेल्या नाहीत. तसेच निविदेत नमुद केल्याप्रमाणे किमान वेतन कायद्याचा भंग न करता आम्ही स्वच्छता सेवा पुरविण्यास तयार असून निविदेतील सर्व अटि व शर्ती आम्हास बंधनकारक रहातील.

जोपर्यंत अंतिम निविदा तयार होवून ती परस्परांच्या संमतीने कार्यान्वित होत नाही तोपर्यंत (निविदा स्विकारणे)सदरच्या प्रक्रियेस बांधिल नाही. तसेच खाली सही करणार यांना हे माहित आहे की, सदरची निविदा प्रक्रिया अंतिम होत नाही तोपर्यंत तुम्ही (निविदा स्विकारणारे)बांधिल नसून तुम्ही अन्य कोणत्याही निविदा स्विकारू अथवा नाकारू शकतात.

निविदा धारकाची सही व शिक्का

## प्रपत्र क्रमांक–2

# सेवा देत असलेल्या संस्थेचे नांव व पत्ता

| अ.क्र | संस्थेचे नांव | सेवा घेतलेल्या संस्थेचे नांव व पत्ता | आदेश क्रमांक व दिनांक |
| --- | --- | --- | --- |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |

## प्रपत्र क्रमांक–3

# ANNUAL TURN OVER STATEMENT FOR THREE YEAR

The Annual Turnover of M/S ......................................................................................for the past Three years are given below and certified that the statement is true and correct

| Sr No | Financial Year | Turnover Rs. in Lakh |
|---|---|---|
| 2019-20 | | |
| 2020-21 | | |
| 2021-22 | | |

Signature of Chartered Accountant
Name ( in Capital letters )

# प्रपत्र क्रमांक–4

मी, ........................................................................................रा. .............ता. .............. जि. ........................
प्रतिज्ञापत्र लिहून देणार ..................................................वय..................धंदा..............पत्ता....................

मी, सत्य प्रतिज्ञापत्र करतो की,

मी, वरील पत्यावर कायमचा रहिवासी असून मा. अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय अलिबाग, जिल्हा रायगड येथील विविध विभाग, प्रशिक्षण संस्था, कार्यालय व वसतीगृह इ. ठिकाणी वर्ग–4 (कक्षसेवक,सुरक्षारक्षक,शिपाई,सफाईगार) दैनंदिन स्वच्छता सेवा पुरविणे या कामाची ई–निविदा भरली असून सदरच्या ई–निविदा मध्ये नमुद केलेले दर हे कामगार कायद्यानुसार किमान वेतन देणेंस बांधील आहे. त्यामुळे सदर कायद्यानुसार कमी दर भरल्यास सदरची निविदा नामंजूर करण्यांत येईलयाची मला पूर्ण कल्पना आहे. याबाबत माझी कोणतीही तक्रार असणार नाही.

तांत्रिक लखोटयामध्ये ( लिफाफा क्र. 1) निविदेमध्ये प्रसिध्द केल्याप्रमाणे आवश्यकती कागदपत्रे मी/आम्ही सादर केलेली आहेत. सदरची कागदपत्रे अपुर्ण अथवा चुकीची असल्यास माझी/आमच्या संस्थेची निविदा नामंजूर करण्यांत येईल याची मला पूर्ण कल्पना आहे.व या अगोदर सुध्दा मी, शासकीय संस्थेच्या ई–निविदेत वार्षिक उलाढाल वा इतर कागदपत्रे कमी जस्त करून अफरातफर केलेली नाही.तसे आढळल्यास याबाबत फौजदारी गुन्हा दाखल करण्यांत येईल याबाबत माझी/आमचे संस्थेची कोणतीही तक्रार रहाणार नाही. याची मला पूर्ण जाणीव आहे.

सदरचे प्रतिज्ञापत्र हे मी, किमान वेतन कायद्याचा भंग करणार नाही. तसेच मी, शासनाच्या कुठल्याही काळया यादीमध्ये समाविष्ठ नसल्याबाबत व माझेवर कोणत्याही स्वरूपाचा गुन्हा नोंद नाही.

वरील सर्व माहिती खरी व बरोबर असून सत्य आहे. सदरची माहिती खोटी ठरल्यास मी, भारतीय दंड संहितेतील कलम 199, 200 व 193 ( 2 ) नुसार होणा–या शिक्षेस व दंडास पात्र राहीन याची मला पूर्ण जाणीव आहे.

दिनांक

## प्रपत्र कमांक–5

## ANNEXURE-5

## List of Manpower

| Sr No | Name | Designation | Age | Aadhar No | Remark |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

# ANNEXURE-06

निविदा धारकाची पुर्ण माहिती

| अनु.क्र | महितीचा प्रकार | माहिती |
|---|---|---|
| 1. | निविदा धारकाचे नाव व संपूर्ण पत्ता | |
| 2. | संस्थेचे नाव | |
| 3. | संस्थेचे संपूर्ण पत्ता | |
| 4. | फोन नं. | |
| 5. | संपर्क मो.क. | 1.<br>2. |
| 6. | फॅक्स क. | |
| 7. | ईमेल आयडी | 1. |
| 8 | संकेत स्थळ | |
| 9 | काम करणाऱ्या सेवा देणाऱ्या एकुण कर्मचाऱ्यांची संख्या. | पुरूष –<br>स्त्री – |
| 10. | बॅकेची माहीती<br>बॅकचे नांव बॅकेची शाखा व पत्ता | |
| | खाते कमांक | |
| | खात्याचा प्रकार | |
| | आय.एफ.एस.सी.कोड | |
| 11. | संस्थेचे उद्योग आधार कमांक | |
| 12. | पॅन कमांक | |
| 13 | जी.एस.टी.कमांक | |
| वरील सर्व माहीती माझ्या माहितीप्रमाणे व जोडलेल्या कागदपत्रांप्रमाणे सत्य व खरी आहे. | | |

निविदा धारकाची स्वाक्षरी व शिक्का

# प्रपत्र कमांक–7

## **वर्ग – ४** मनुष्यबळ सेवा

(दिलेल्या ई–निविदेमध्ये **BOQ Excel**मध्ये दर भरावेत )

निविदाधारकाचे नांव :–

| अ.क्र. | मनुष्यबळ सेवेचेनाव | एकूण कर्मचारी | एकक | एका कर्मचा-याचे एका महिन्याचे मासिक मुळ वेतन (सर्व करासहित) |
|---|---|---|---|---|
| 1 | **कक्षसेवक**<br>( प्रति दिन 08 तास सेवा) | २१० | प्रति कर्मचारी एक महिन्यासाठी<br>**(सर्व करासहित)**<br>दर नमुद करावे | रु. १५,०००/- |
| 2 | सफाईगार<br>( प्रति दिन 08 तास सेवा) | १९१ | प्रति कर्मचारी एक महिन्यासाठी<br>**(सर्व करासहित)**<br>दर नमुद करावे | रु. १५,०००/- |
| ३ | शिपाई<br>( प्रति दिन 08 तास सेवा) | १८ | प्रति कर्मचारी एक महिन्यासाठी<br>**(सर्व करासहित)**<br>दर नमुद करावे | रु. १५,०००/- |
| ४ | **सुरक्षा रक्षक**<br>( प्रति दिन 08 तास सेवा) | ४५ | प्रति कर्मचारी एक महिन्यासाठी<br>**(सर्व करासहित)**<br>दर नमुद करावे | रु. १५,०००/- |

निविदा धारकाची स्वाक्षरी व शिक्का